## जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख(म.राज्य) पुणे यांचे कार्यालय
## नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, पुणे

---

वाचा:१.महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रकक्र.आरएएम/१०९०/(२१०४) / ल-६ दि. २७/१२/९०.
२.महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रकक्र.आरएएम-१०९०/२१०४/ल-६ दि.१९/२/९२ .
३.महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रकक्रमांक : एस १४९७/प्र.क्र.५१३/ल-६ दि.२४/११/९७
४.महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रकक्र.संकीर्ण-१००५/ प्र.क्र.३४६/ल-६ दि. २१/१/२००६.
५.या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.सिटीएस/सीआर ८०२१/ना.भु.४/२०१० दि. १५ जुलै २०११ दि.१६ /७/२०११.
६.या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.ना.भु.१ /७-१२ बंद करणे /कार्यपध्दती/२०१८ दि. ३०/०८/२०१८

---

क्र.ना. भु.३ / प्र.क्र. ०१ /२०२१-२२ पुणे, दिनांक. ०७/०६/२०२२

परिपत्रक:

विषय:- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ अन्वये नागरी भुमापन झालेल्या क्षेत्रातील अधिसूचित केलेल्या सर्व्हे नंवर / गट नंवरचे व नगर भूमापन क्रमांकाशी मेळ ( Mapping ) घेणेबाबत

प्रस्तावना :

नगर भूमापन हद्दीतील /क्षेत्रातील दुहेरी अधिकार अभिलेखाची सुरु असणारी कार्यपध्दती बंद करून नियमाप्रमाणे आवश्यक असणारा एकच अधिकार अभिलेख चालु ठेवण्यासाठी (दुहेरी अभिलेख बंद करणेबावत) उपरोक्त वाचा सदरील नमूद १ ते ६ चे परिपत्रकान्वये वेळोवेळी मार्गदर्शन , सुचना व आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचा तपशील परिशिष्ट १ मध्ये आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे. तीन दशके ओलांडूनही नागरी क्षेत्रातील दुहेरी अभिलेख बंद करणेबाबत अदयाप कार्यवाही पुर्ण झालेली नाही. परिणामस्वरूप मालकी हक्क , कब्जा व अभिलेखावाबत गुंतागुंत निर्माण झाली आहे /होत आहे. अधिकार अभिलेखावरील नोंदी व मिळकत पत्रिकेवरील नोंदी यामध्ये विसंगती दिसून येत आहे. दुहेरी अधिकार अभिलेखाचे आधारे हस्तांतरणाचे व्यवहार होवून फसवणूक होण्याचे प्रकार वाढत आहेत..मिळकत पत्रिका न उघडता अधिकार अभिलेख ७/१२ बंद करण्यात आलेला आहे. अशाही वाबी निदर्शनास आल्या आहेत.त्यामुळे यादृष्टीने ठोस उपाय योजना करणे आवश्यक आहे.

नागरी भूमापन क्षेत्रातील अधिसूचित सर्व्हे नंवर / गट नंबर व त्यास अंतिम केलेला नगर भूमापन क्रमांक, वीनशेती असलेले कोणते ७/१२ चालू आहेत , वीनशेती झालेले ७/१२ वंद झालेले आहेत परंतु त्याच्या मिळकत पत्रिका उघडलेल्या नाहीत, यांची निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे नियोजन, अम्मलवजावणी व नियंत्रण प्रभावीपणे करता येत नाही.त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आज्ञावली विकसित करुन माहिती संकलीत करणे आवश्यक आहे.

आज्ञावली विकसन :

नागरी क्षेत्रातील कलम १२२ अन्वये अधिसूचित सर्व्हे नंबर व गट नंबर यास अंतिम केलेला नगर भूमापन क्रमांक ( सिटी सर्व्हे क्रमांक ) याचा मेळ ( MAPPING ) घेण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.याबाबत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राकडून आज्ञावली (NIC PUNE) विकसित करून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पुर्वतयारी :

विकसित आज्ञावली उप अधीक्षक भूमि अभिलेख व नगर भूमापन अधिकारी यांना तहसील स्तरावर उपलब्ध करून दिली आहे. त्यांनी सदरची माहिती आज्ञावलीमध्ये भरावयाची आहे. आज्ञावलीमध्ये माहिती भरण्यास सुरूवात करण्यापुर्वी उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी खालील प्रमाणे पूर्व तयारी करावयाची आहे.

१. नगर भूमापन झालेल्या सर्व गावाच्या महाराष्ट्र जमीन महसल अधिनियम १९६६ चे कलम १२२ नुसारची अधिसूचना -

अ) ही अधिसूचना नगर भूमापन झालेल्या गावाच्या गाव धारिकेत ( पंजी ) घटकदर प्रस्ताव मंजुरी, परीरक्षण प्रस्ताव , राजपत्र धारीकेत उपलब्ध असते. अधिसुचनेमध्ये १२२ च्या हद्दीत समावीष्ट स.नं. /ग.नं. नमूद असतात. अशी अधिसुचना शोधावी. भूमापन कार्यालयात उपलब्ध नसल्यास जिल्हाधिकारी , उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांचे कार्यालयाकडे उपलब्ध आहे किंवा कसे यावरुन शोध घेवून प्राप्त करुन घ्यावी

ब) अधिसुचनेचा कसून शोध घेऊनही उपलब्ध होत नसल्यास अधिसुचना उपलब्ध नसल्याचे सोबतच्या नमुन्यात घोषणापत्र तयार करावे. नगर भूमापन आलेख , चौकशी नोंदवही ,मिळकत पत्रिका यावरून नगर भुमापन हद्दीत समाविष्ट सर्व्हे नंबर / गट नंबरची यादी तयार करावी. शिरस्तेदार यांनी १०० टक्के पडताळणी करावी.

२. उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी उपरोक्त नमूद "अ" मधील अधिसूचना किवा "ब" मधील यादी यावरुन का. क.१२२ अन्वये अधिसुचित सर्व्हे नंबर / गट नंबर व त्यांना देणेत आलेला नगर भूमापन क्रमांक याचा मेळ घेऊन यादी तयार करावी. यादी सबंधीत शिरस्तेदार यांनी १०० टक्के तपासणी करावी.

३. अधिसूचनेत नमूद सर्व्हे नंबर / गट नंबरमध्ये वाडी विभाजन,एकत्रीकरण ,कमीजास्त पत्रक इ. कारणामुळे बदल झालेला असल्यास त्या संबंधीचे आदेश प्राप्त करून घेणे व जुना सर्व्हे नंबर / गट नंबर त्याचा सदयाचा चालू सर्व्हे नंबर / गट नंबर अशी यादी तयार करणे व त्यांना देणेत आलेला नगर भूमापन क्रमांक याचा मेळ घेऊन सदर नगर भूमापन क्रमांक सदर यादीमध्ये नमूद करावा. यादी सबंधीत शिरस्तेदार यांनी १०० टक्के तपासणी करावी.

४.सदरची सुविधा (https://epropertcard.enlight/cloud.com ) या ePCIS आज्ञावलीमध्ये खालीलप्रमाणे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सेवा अहवाल

↓

मालमत्ता पत्रकामधील सेवा

↓

कलम 122 अन्वये अधिसूचित सर्व्हेनंबर / गट नंबर

५. कलम १२२ च्या हद्दीतील स.नं. / ग.नं. चे मॅपींग (या पुढे मॅपींग आज्ञावली असा उल्लेख केलेला आहे) नगर भूमापन क्रमांकाशी करण्यावावत आज्ञावलीचे वापरकर्ता मॅन्युअल परिशिष्ट २ सोवत जोडले आहे. मॅन्युअल मधील सूचनांनुसार मॅपींग करण्याची कार्यपध्दती अनुसरणेत यावी.

६. मॅपींग आज्ञावली मध्ये चार भाग आहेत

A.अधिसूचनेवावतची माहिती.
B.सर्व्हे नंवर/गट नंवरची माहिती / तपशील
C. सर्व्हे नंवर/गट नंवर चे नगर भूमापन कार्यक्षेत्र व नगर भूमापन क्रमांकावरोवर मॅपींग
D.अहवाल :

a. अधिसूचने वावतची माहिती. (फ्लॅगींग):- या टॅवमध्ये महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ नुसार अधिसुचित सर्व्हे नं./गट नं ची माहिती (१ अ) अथवा घोषणापत्रानुसार तयार केलेली माहिती (१ ब) भरावयाची आहे. त्यामध्ये गावातील संपुर्ण सर्व्हे नंवर /गट नंवर कलम १२२ अन्वये अधिसुचीत असल्यास संपुर्ण गाव ,किंवा गावातील काही सर्व्हे नंवर/गट नंवर कलम १२२ अन्वये अधिसुचीत असल्यास पैकी गाव असा तपशील निवडणेचा आहे. नगर भूमापन पुर्ण झालेल्या,नगर भुमापन चालु असलेल्या व १२२ ची अधिसूचना मंजूर झालेल्या परंतू अद्याप नगर भूमापन काम सूरू न झालेल्या, त्याच वरोवर यापुढे जसजसे नगर भूमापन होईल अशा सर्व गाव , शहर व नगरांची माहिती भरणेची आहे. कलम १२६ अन्वये अधिसुचित सर्व्हे नंवर /गट नंवर मध्ये काही वदल झाल्या असल्यास असे वदलेले सर्व्हे नंवर /गट नंवर ची माहिती भरणेची आहे. (कृपया मुद्दा क्रमांक ३ पहा)

b. सर्व्हे नंवर/गट नंवरची माहिती / तपशील :- या टॅव मध्ये अधिसुचनेवावत भरलेली माहिती अधिसुचना आय.डी सह उपलब्ध होते. त्यामध्ये संपुर्ण सर्व्हे नंबर /गट नंबर व पैकी गाव ,पैकी सर्व्हे नंबर/पुर्ण सर्व्हे नंबर /गट नंबर या टॅव मध्ये भरना करावे. नगर भूमापन पुर्ण झालेल्या,नगर भुमापन चालु असलेल्या व १२२ ची अधिसूचना मंजूर झालेल्या परंतू अद्याप नगर भूमापन काम सूरू न झालेल्या, त्याच वरोवर या पुढे जसजसे नगर भूमापन होईल अशा सर्व गाव , शहर व नगरांची माहिती भरणेची आहे. कलम १२६ अन्वये अधिसुचित सर्व्हे नंबर /गट नंबर मध्ये काही बदल झाला असल्यास असे बदलेले सर्व्हे नंबर /गट नंबर ची माहिती भरणेची आहे,त्यामध्ये जुना व नविन सर्व्हे नंबर/गट नंबर भरणेचा आहे.

c. सर्व्हे नंबर/गट नंवरचे नगर भूमापन कार्यक्षेत्र व नगर भूमापन क्रमांकावरोवर मॅपींग :-या टॅवमध्ये टॅव क्रमांक a व b मध्ये भरलेली माहिती उपलब्ध होते. ७/१२ चा सर्व्हे नंबर/गट नंबर , क्षेत्र, नगर भूमापन क्रमांक /क्षेत्र इत्यादी डेटा संगणकीकृत आज्ञावलीमधून उपलब्ध करून दिला जातो. निवडलेल्या ७/१२ चे सर्व्हे नंबर / गट नंबर यास लागु असलेले नगर भूमापन कार्यक्षेत्र (तालुका,कार्यालयाचे नाव व सजा/पेठ) कोणते आहे हे याठिकाणी निवडावयाचे आहे.त्याच वरोवर त्या सर्व्हे /गट नंबरला कोणता/कोणते नगर भूमापन क्रमांक देण्यात आलेले आहेत ते नमूद करणेचे आहे. संगणकीकृत डेटा मध्ये नगर भूमापन मिळकतपत्रीका व त्याचा क्रमांक उपलब्ध नसल्यास व तो हस्तलिखीत मिळकतपत्रीकेवरून घेण्याचा आहे. नगर भूमापन क्रमांक व त्याची मिळकतपत्रीका उपलब्ध नसल्यास उपलब्ध नाही असा पर्याय वापरण्याचा आहे. या टॅव मध्ये नगर भूमापन पुर्ण झालेल्या सर्व गाव , शहर व नगरांची माहिती भरणेची आहे. थोडकयात हा टॅव ७/१२ व प्रॉपर्टी कार्डचे मॅपींगचा आहे.

७.एकाच सर्व्हे नंवर / गट नंवरसाठी एकच नगर भूमापन क्रमांक अंतिम केला असल्यास त्याचे MAPPING करणे सोयीचे आहे. सदरचे काम प्राधान्याने करावयाचे आहे.

८.एकाच सर्व्हे नंबर / गट नंवरसाठी अनेक नगर भूमापन क्रमांक अंतिम केले असल्यास त्याची यादी तयार ठेवणे . शक्यतो सर्व्हे नंबर / गट नंवरचे एकूण क्षेत्र आणि नगर भूमापन क्रमांकाचे अंतिम केलेले क्षेत्र याचा मेळ घेण्यात यावा.

९. जर कलम १२२ अंतर्गत पैकी सर्व्हे नंबर क्षेत्रास नगर भूमापन क्रमांक दिलेला असेल तर नगर भूमापन अधिकारी/ उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरस्तेदार , प.भू. यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून कागदपत्रांच्या आधारे खात्री व पडताळणी करुन पैकी स.नं. च्या क्षेत्रास कोणता नगर भूमापन क्रमांक पडला आहे याची माहिती भरावी. सदर काम प.भू यांनी पुनर्विलोकनावेळी करावे. याकामी या कार्यालयाचे उपरोक्त वाचा सदरी नमूद अनुक्रमाक ६ चे परिपत्रकातील सुचनांनुसार कार्यवाही करावी.

१०.मॅपींग कामाचा आढावा :- या आज्ञावलीमध्ये रिपोर्ट या सदरी वेगवेगळे अहवाल उपलब्ध करून देण्यात आले आहे त्या आधारे उप अधीक्षक,जिल्हा अधीक्षक भूमि अभीलेख व उपसंचालक भूमि अभिलेख यांनी वेळोवेळी आढावा घेणेचा आहे.

सहीXXX
(एन.के.सुधांशु )
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख ( म.राज्य ),पुणे

स्थळ :पुणे
दिनांक : ०७/०६/२०२२

प्रत : मा.अपर मुख्य सचिव ( महसूल ) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.
प्रत : विभागीय आयुक्त सर्व यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :जिल्हाधिकारी सर्व यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत : अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक,भूमि अभिलेख यांना माहितीस्तव रवाना
प्रत:उपसंचालक भूमि अभिलेख,सर्व यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सर्व यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत : उप अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व) / नगर भूमापन अधिकारी (सर्व) / विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख गांवठाण / चौकशी (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

"निर्गमित"

( बाळासाहेब काळे )
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन)पुणे.



Scanned by CamScanner

## परिशिष्ट १

### दुहेरी अभिलेख बंद करणेबाबत महत्वाचे सुचना

नागरी भागात ज्या जमिनींना अकृषिक परवानगी देण्यात येते त्या जमिनीची नोंद प्रॉपर्टी कार्डवर (मिळकत पत्रिका) घेण्यात येते. नगर भूमापन झालेल्या क्षेत्रामध्ये भूमापन अधिकारी यांच्याकडून मिळकत पत्रिका जतन व संधारन करण्यात येवून त्यांच्या प्रती भूमापन अधिकारी यांच्याकडून देण्यात याव्यात.अशा जमिनीचे ७/१२ उतारे तलाठ्याकडून देण्यात येऊ नयेत तसेच अशा जमिनीबाबत भूमापन अधिकारी यांच्याकडून मालकी हक्काबाबत फेरबदल झाल्याची अधिकृत माहिती प्राप्त झाल्याखेरीज कोणताही फेरबदल ७/१२ च्या उता-यामध्ये करण्यात येऊ नये अशा आशयाच्या सूचना परिपत्रकातील वाचा सदरी क्रमांक १ मध्ये नमूद परीपत्रकाने देण्यात आलेल्या आहेत.

परिपत्रकातील वाचा सदरी नमूद अनुक्रमांक २ च्या परिपत्रकान्वये सारांशाने सूचना देण्यात आल्या आहेत की,ज्या नागरी क्षेत्रामध्ये अकृषक प्रयोजनासाठी परवानगी दिलेली आहे पण नियमानुसार मिळकत पत्रिका तयार करण्यात आलेली नसेल तर मिळकत पत्रिका अंमलात येईपर्यंतच्या कालावधीसाठी उक्त जमिनीचे ७/१२ उतारे संबधितांना देण्यात यावेत.सदर जमिनीचे मिळकत पत्रिका तयार झाल्यावर व ते अंमलात आल्यानंतर गाव नमुना ७/१२ चे उतारे व ७/१२ उता-यावर फेरफार करण्यात येऊ नये.

परिपत्रकातील वाचा सदरी नमूद अनुक्रमांक ३ च्या परिपत्रकान्वये सारांशाने सूचना देण्यात आल्या आहेत की,

१)नगर भूमापन झालेले आहे , अशा अकृषक जमिनीवरील पीक पाहणीची नोंद करू नयेत.

२)अशा क्षेत्राची मिळकत पत्रिका तयार झाली असल्यास ७/१२ चा वापर करण्यात येऊ नये.

३)मिळकत पत्रिका हीच सदर जमिनीचे कायदेशिर कागदपत्र समजण्यात यावे.

महानगरपालिकांच्या विस्तारित क्षेत्रात येणारी गावे तसेच नगर भूमापन झालेल्या क्षेत्रात ७/१२ उतारा बंद करणेसाठी राबवावयाच्या मोहिमेबाबत शासनाकडील दिनांक २१ जानेवारी २००६ च्या परिपत्रकाने सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

नगर भूमापन हद्दीतील बिनशेती वापराच्या मिळकतीच्या मालकी हक्काची दुहेरी नोंद पध्दत बंद करणेबाबत जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून दिनांक १६ जुलै २०११ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यामध्ये नगर भूमापन योजनेच्या तरतुदी नगर भूमापन हद्दीतील केवळ बिनशेती वापराच्या जमिनीस लागू आहेत. त्यामुळे नगर भूमापन हद्दीतील जमिनीचा वापर बिगरशेती कारणाकरीता करण्यारा महसूल विभागाने अधिकृत परवानगी दिल्यानंतर सदर जमिनीची रितसर



Scanned by CamScanner

बिनशेती मोजणी होऊन नकाशा,क्षेत्र आणि मालकी हक्काच्या नोंदी नगर भूमापन अभिलेखात कायम झाल्याची खात्री करून फक्त त्याच जमिनीचा ७/१२ उतारा महसूल विभागाकडून वितरित करणेचे बंद करणेत यावे.अशा सुचना आहेत.

नगर भूमापन हद्दीतील बिनशेती वापराच्या मिळकतीच्या मालकी हक्काची दुहेरी नोंद पध्दत बंद करणेबाबत शासनाकडून तसेच जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सर्व परिपत्रकाचा त्यातील सुचनांचा उल्लेख करून सविस्तर मार्गदर्शक सूचना दिनांक ३० ऑगस्ट २०१८ च्या परिपत्रकाने निर्गमित करण्यात आल्या आहेत.७/१२ बंद करणेबाबत ,७/१२ वरील नावे मिळकत पत्रिकेवर घेणे बाबत,मिळकत पत्रिका व ७/१२ अशा दुहेरी नोंदी असल्यास,मिळकत पत्रिका व ७/१२ यांचेवरील नमूद क्षेत्रामध्ये तफावत असल्यास काय कार्यवाही करावयाची याच्या सविस्तर सूचना देऊन बंद ७/१२ बाबत गाव नमुना नंबर २ अद्यावत करून नगर भूमापन अधिकारी यांना पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



Scanned by CamScanner

क्र. ना. भु.३ / प्र.क्र. ०१ /२०२१-२२ दिनांक ७/६/२०२२ रोजीच्या स.न./ग.न.आणि न.भु.क्रमांकाशी mapping करणेबाबतच्या परीपत्रकासोबतचा नमुना

---

**० घोषणापत्र ०**

प्रमाणित करणेत येते कि, मौजे :------------------ तालुका :--------------- जिल्हा :------------------ या गावाची / शहराची नगर भूमापन योजनेची अधिसूचना गाव दफ्तरी, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख /उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयात कसून शोध घेऊनही उपलब्ध झालेली नाही.

नगर भूमापन आलेख , चौकशी नोंदवही ,अधिकार अभिलेख ७/१२ व मिळकत पत्रिका या आधारे नगर भूमापन हद्दीमध्ये अधिसूचित सर्व्हे नंबर / गट नंबर याची यादी तयार करून पडताळणी केलेली आहे.ती योग्य व बरोबर आहे.

स्थळ :

दिनांक :

(----------------)
उप अधीक्षक भूमि अभिलेख /
नगर भूमापन अधिकारी

(----------------)
शिरस्तेदार ----------

**मौजे :---------तालुका :----------जिल्हा :-----------येथील का.क.१२२ अन्वये अधिसूचित स.न./ग.न.यांना अंतिम केलेला न.भु.क्र. याची यादी**

| अ. क्र. | अधिसुचनेप्रमाणे स.न./ग.न. | गावातील संपूर्ण स.न./ग.न.अधिसूचित झाले आहेत काय ? होय /नाही | बदल झाला असल्यास नवीन स.न./ग.न. | कारण | क्षेत्र | अंतिम केलेला न.भु.क्र. | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ अन्वये नागरी भुमापन झालेल्या क्षेत्रातील अधिसूचित केलेल्या सर्व्हे नंबर / गट नंबरचे नगर भूमापन क्रमांकाशी मेळ ( Mapping ) घेणेबाबत

आज्ञावलीत माहिती भरताना काय करावे ?

१)सर्वप्रथम संबंधित परिरक्षण भूमापकाने आपल्या सजातील सर्व नगर भूमापन झालेल्या गावांची यादी तयार करावी.

२)सदर यादी नुसार सिटी सर्वे झालेल्या प्रत्येक गावाच्या गाव पीसी मधून प्रत्येक गावची १२२ ची नोटिफिकेशन अर्थात अधिसूचना प्राप्त करून घ्यावी

३) एखाद्या गावाची अधिसुचना उपलब्ध न झालेस अभिलेख कक्षामध्ये /तहसिलदार /उपविभागीय अधिकारी/ जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातून अधिसूचना प्राप्त करुन घ्यावी.तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, उपसंचालक भूमि अभिलेख, यांचे कार्यालयात गाव परिरक्षणास घेणे धारिकेतून च्या अधिसूचना उपलब्ध होऊ शकते. इतका शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यास त्याबाबत प्रमाणपत्र तयार ठेवणे.

४) अधिसुचना उपलब्ध न झालेस नगर भुमापनाचे मुळ आलेखावरून अधिसूचित सर्व्हे नंबर / गट नंबरची यादी तयार करणे.

५) संबंधित गावात वाडी विभाजन/ एकत्रिकरण / क.जा.प. /भूसंपादन यामुळे सर्व्हे नंबर / गट नंबर मधे बदल झाला असल्यास जुना स.नं./ ग.नं. व यास नव्याने मिळालेला स.नं. /ग.नं. यांची यादी तयार ठेवावी.

६) अधिसूचित केलेल्या स.नं. / ग.नं. यास नगर भुमापन मूळ चौकशीवेळी कायम करणेत आलेल्या न.भु.क्र.याची स.नं./ ग.नं. निहाय स्वतंत्र यादी तयार करणे.

७) अधिसुचनेमध्ये पैकी गटाचे किंवा पैकी स. न. चे क्षेत्र घेतले असल्यास त्या गटाची/सर्व्हे नंबरची जागेवर स्थळ पहाणी आवश्यक ती मोजणी करून त्यास देणेत आलेल्या न.भू.क्र. ची खात्री करणे

८) संबधित परिरक्षण भूमापक यांनी यासाठी त्या भागाचा गुगल मॅप तसेच गावचा सिटी सर्व्हे चा नकाशा शोधून तयार ठेवावा. नकाशा शिवाय अचूक काम पूर्ण करता येणार नाही

९) जागेवर मिळकतीचा प्रत्यक्ष वापर काय आहे उदा. घर , शेती ,औद्योगिक , वाणिज्य याची नोंद घ्यावी.

१०)संबंधित गावातील सर्वच गट नंबर/ सर्व्हेनंबर अधिसूचित झाले आहेत किंवा नाही. यांच्या नोंदी तयार ठेवणे.( गावातील सर्वच गट नंबर/ सर्व्हेनंबर अधिसूचित केले असतील तर पूर्णगाव नसतील तर पैकीगाव हा पर्याय नोंदविवयाचा आहे.)

११) अधिसूचित क्षेत्रातील बिनशेती आदेशाच्या प्रती व नकाशा यांच्या प्रती तयार ठेवाव्यात.

१२)वरील सर्व माहिती तयार झालेनंतर भाग १,२ व ३ मध्ये माहिती भरणे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ अन्वये नागरी भुमापन झालेल्या क्षेत्रातील अधिसूचित केलेल्या सर्व्हे नंबर / गट नंबरचे व नगर भूमापन क्रमांकाशी मेळ ( Mapping ) घेणेबाबत

आज्ञावलीत माहिती भरताना काय करु नये ?

१. अधिसूचित नसलेल्या स.न./ ग.नं. याचे मॅपिंग करु नये.

२. अधिसुचनेमध्ये पैकी स.न/ पैकी ग.नं. अधिसूचित केला असल्यास पूर्ण गटाचे किंवा पूर्ण सर्व्हे नंबरचे मॅपिंग करुन नये.

३.अधिसूचनेमध्ये नमूद नसलेल्या मिळकतीस सि.स.नं. दिला गेला असल्यास त्याचेही मॅपिंग करु नये.

४.अधिसूचित स.नं./ग.नं. व त्यास अंतिम केलेला सिं.स. नं. या दोन्ही मधील क्षेत्राचा मेळ घेणे या ठिकाणी अभिप्रेत नाही.